क्रमांक : ७१

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### सोमवार, दिनांक २७ एप्रिल, २०२६ / वैशाख ७, १९४८ (शके)

### ७१. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

विधानसभेचे सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २२९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १७७ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती. आता ५२ निवेदनांपैकी १३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित ३९ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्मा. विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,<br>
मुंबई<br>
दिनांक : २७ एप्रिल, २०२६

**मेघना तळेकर**<br>
सचिव-२,<br>
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :-

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य<br>
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव<br>
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी<br>
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय<br>
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष<br>
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये<br>
१०) संगणक कक्ष (WEBSITE)

पु/४०७

५६

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र. ७५७**

**मा.श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७५७ पुढीलप्रमाणे आहे:-**

"मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील डि एन नगर येथे एअरपोर्ट अथॉरिटीच्या जमीनीवर असलेल्या ट्रान्समिशन टॉवर्सच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पुर्नविकासासाठी हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बध असणे, यामुळे डि एन नगर व गुलमोहोर या परिसरातील विकास खोळंबलेला असणे, अनेक मध्यमवर्गीय कुटुंबे गेल्या ४० ते ५० वर्षापासून राहत असलेल्या इमारती जीर्ण झाल्या असणे, सदर निर्बधामुळे येणाऱ्या नजीकच्या काळामध्ये मध्यमवर्गीय कुटुंबे राहत असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत असे घोषीत करण्यात आले तर रस्त्यावर येण्याची शक्यता असणे, सदर जमीनीवर असलेले ट्रान्समिशन टॉवर इतरत्र हलवून डी एन नगर व गुलमोहोर परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याची आवश्यकता असणे, डी एन नगर व गुलमोहोर परिसर या आजूबाजूच्या परिसरामध्ये असलेला हाईट रिस्ट्रीक्शन व निर्बंध हटवण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये शासनाने पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर सदर विषयाचा निर्वाळा करण्याचे वचन दिलेले असणे तसेच पावसाळी अधिवेशनात पुढील सहा महिन्यात होईल असे आश्वासन दिलेले असणे, परंतु अद्याप पर्यंत सदर विषयांमध्ये कोणतीही प्रगती झाली नसून सदर विषय हा गेली पाच वर्ष प्रलंबित असल्यामुळे सदर परिसरातील बेघर होण्याची पाळी येत असल्यामुळे लोकांमध्ये शासनाबाबत तिव्र संतापाची भावना निर्माण होत असल्यामुळे सदर विषयावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन**

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यामार्फत अंधेरी (पश्चिम) तसेच दहिसर (पूर्व) येथे त्यांच्या जमिनीवर High Frequency Communication equipment बसविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाने इमारत उंची संबंधातील नियमावली दि. १७/१२/२०२० रोजी निर्गमित केली असून सदर नियमावलीनुसार मुंबईतील सदर परिसरातील High Frequency (HF) Transmitter and HF Receiver प्रभावातील क्षेत्रात येत असलेल्या बांधकामांच्या उंचीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर निर्बंधांमुळे आजूबाजूच्या परिसरातील इमारतींचे पुर्नविकासामध्ये अडथळे येत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

रिसिव्हींग स्टेशनचे परीसरातील बऱ्याच जुन्या रहिवासी इमारतींचा पुर्नविकास सदर क्षेत्रावरीला उंचीवरील निर्बंधांमुळे व्यवहार्य होत नसल्याने, परिसरातील पुर्नविकासामध्ये बाधा येत असल्याची बाब विचारात घेता, अंधेरी व दहिसर येथील रडार केंद्रांचे इतरत्र स्थलांतरीत करणेबाबत तसेच त्याकरीता पर्यायी

जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन वेळोवेळी केंद्र शासनास पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

याबाबत केंद्रीय मंत्री तसेच केंद्र शासनाचे शासनाचे संबंधित अधिकारी यांचेशी वेळोवेळी चर्चा करण्यात आली असून, त्यास केंद्र शासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्यानुसार शासन नगर विकास विभागाकडील दि. १०/१२/२०२५ रोजीचे पत्राद्वारे दहिसर येथील रडारचे स्थानांतरण करण्याचे अनुषंगाने केंद्र शासनास विनंती करण्यात आली असून स्थानांतरण खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे :-

१. दहिसर येथील रडार ( High Frequency Tx/Rx station) केंद्रांचे गोराई येथे स्थानांतर करण्यासाठी शासन / बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी गोराई येथील जमीन भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास (AAI) मोफत हस्तांतरित करण्यात येईल, स्थानांतरणासाठी लागणारा खर्च बृहन्मुंबई महानगरपालिका करेल.

२. भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने दहिसर येथील त्यांचे ५८ एकर क्षेत्रफळाच्या भूखंडापैकी ५०% क्षेत्र हे कायमस्वरूपी सार्वजनिक उद्यान विकसित करण्यासाठी वापरण्यात यावे व उर्वरित ५०% क्षेत्राचा उद्देशित प्रयोजनार्थ वापर निश्चित करून, त्याकरीता वापर बदलाचा प्रस्ताव शक्य तितक्या लवकर शासनाकडे सादर करावा, असे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

जुहू मिलिटरी स्टेशन, अंधेरी (पश्चिम) येथील रडाचे इतरत्र स्थांनांतरण करणेसाठी पर्यायी जागा शोधण्यासाठी तांत्रिक पथकाला (AAI) आमंत्रित केले आहे. बीएमसी त्यांना महापालिका किंवा शासनाच्या मालकीच्या उपलब्ध जमीनी दाखवेल. हा तांत्रिक अभ्यास पूर्ण झाला आणि पर्यायी जागा निवडली गेली की, जुहू मिलिटरी स्टेशन येथील रडार केंद्र स्थानांतरीत मंजूरीची प्रक्रिया सुरु होईल. दहिसर येथील रडार स्थानांतरणाचे प्रक्रियेच्या धर्तीवर जुहू मिलिटरी स्टेशन, अंधेरी (पश्चिम) येथील रडार देखील स्थांतरीत करण्याची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

जूहू व दहिसर येथील रडारचे परिसरातील मोडळीस आलेल्या इमारतींचे पुर्नविकासातील बाधा दुरु करण्याच्या अनुषंगाने रडारचे स्थांनांतरण सत्वर करण्याकरीता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास विनंती करण्यात आली असून, त्यास केंद्र शासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

***********************

लक्षवेधी सुचना क्र.८८३
प्र/४०e

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री.मुरजी (काका) पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित लक्षवेधी सुचना क्र.८८३ खालीलप्रमाणे आहे :-

"मुंबई, गोरेगाव, पश्चिम द्रुतगती महामार्गालगत असलेली नेस्को एक बहुआयामी कंपनी असून कंपनी विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असणे सदर कंपनीच्या अनेक उप कंपन्या असणे, त्यांच्याकडून विविध प्रकारचे अनेक उत्पादने उत्पादन करून याठिकाणी त्यांचे मोठे-मोठे प्रदर्शने, अधिवेशने, फूडकोर्ट व तसेच आंतरराष्ट्रीय मोठे मोठे व्यापार मेळे, सांस्कृतिक कार्यक्रमे आयोजित केले जात असणे, सदरची प्रदर्शने, व सांस्कृतिक व इतर कार्यक्रमे तसेच इतर विविध कार्यक्रमे दररोज आयोजित केले जात असून यात सदर प्रदर्शनासाठी व कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात लाखोच्या संख्येने वाहने येत असल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर व इतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत असणे, वाहतुकीच्या कोंडीचा नागरिकांना व प्रवाशांना मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत असणे, त्याचा नाहक मनस्ताप होत असल्याने नागरिकांमध्ये व प्रवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असणे, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदय यांचे निवेदन

बृहन्मुंबई पोलीस दलाच्या जोगेश्वरी वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये नेस्को प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे खाजगी मालकीचे प्रदर्शन केंद्र आहे. सदर ठिकाणी विविध प्रकारच्या प्रदर्शनांचे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सदर कार्यक्रमांसाठी नेस्को येथील हॉल भाडेतत्त्वावर देण्याचे पूर्ण अधिकार नेस्को कंपनीकडे आहेत.

आयोजकाने प्रदर्शन अथवा कार्यक्रमासाठी नेस्कोकडून भाडेतत्त्वावर हॉल उपलब्ध करुन घेतल्यानंतर त्यासाठी मुंबई महानगरपालिका, अग्निशमन विभाग, इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर, वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस ठाण्याची ना हरकत प्राप्त करून घेतल्यानंतरच सदरच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

सर्वसाधारणपणे एका महिन्यामध्ये दहा ते पंधरा वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन नेस्कोमध्ये होते. सदर कार्यक्रमांसाठी सरासरी पाच ते दहा हजार लोकांची उपस्थिती असते. मोठे सांस्कृतिक कार्यक्रम अथवा प्रदर्शनाच्या वेळी ही उपस्थिती जास्त असते.

उपरोक्त प्रमाणे आयोजित प्रदर्शनासाठी व कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने वाहने येत असल्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावर व इतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते ही बाब खरी आहे. सदर वेळी वाहतुक कोंडी टाळण्याकरीता प्रदर्शनावेळी वाहतूक कोंडी झाल्यास पश्चिम द्रुतगती महामार्गवरून वाहतुकीच्या विरुध्द दिशेने एक मार्गीका सुरू करून वाहन चालकांना त्यांचे इच्छीत स्थळी मार्गस्थ करण्यात येते. जास्तीत जास्त वाहतुक अधिकारी अंमलदार यांची नेमणुक करून वाहतुक कोंडी कमी करण्यात येत असते. तसेच नेस्को प्रदर्शनावेळी आयोजकांच्या मागणीप्रमाणे ट्रॉफिक वॉर्डन वाहतूक पोलीसांच्या मदतीसाठी पुरवले जात असून, ते वाहतूक पोलीसांना वाहतुकीचे नियमन करण्यात मदत करतात.

****

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन**

**मा.श्री. अबू आझमी, विधानसभा सदस्य, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.१०६२ पुढीलप्रमाणे आहे:-**

""भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत भिवंडी शहरातील प्रमुख अंजूरफाटा ते राजीव गांधी चौक रोडवरील दुकाने आणि घरे यांना मेट्रो प्रकल्प व प्रारूप विकास आराखडा यांच्या नावाखाली केवळ २४ तासांचा नोटीस देऊन, कोणताही पंचनामा न करता आणि कोणतीही नुकसानभरपाई न देता तोडण्यात आले असल्याची बाबा दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, अंजूरफाटा-राजीव गांधी चौक हा मार्ग पुढे कल्याण रोड-टेमघर मार्गाशी जोडला जात असल्याने संपूर्ण मार्गावरील (कल्याण रोड) सर्व दुकानदार, घरमालक तसेच मार्गावरील मंदिरे, मशिदी, दरगाह इत्यादी धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांमध्येही संभाव्य तोडक कारवाईबाबत तीव्र भीतीचे वातावरण निर्माण होणे, राज्य सरकारने राजीव गांधी चौक ते टेमघर मार्गावरील ५ मंदिरे, २ मशिदी, २ दरगाह, १ कब्रस्तान, १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच हजारो नागरिकांचे घर व रोजगार सुरक्षित ठेवण्यासाठी सुमारे १७०० कोटी खर्च करून भूमिगत मेट्रोचा निर्णय घेतला असतानाही भिवंडी निजामपूर महानगरपालिका त्याच मार्गावर रस्ता रुंदीकरणाची योजना राबवत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संभ्रम व चिंता निर्माण होणे, होत असलेली कारवाई थांबविण्याकरिता मा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, आयुक्त एमएमआरडीए यांना भेटून निवेदन देण्यात येणे, सदर विषयी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

**मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन**

शासन नगर विकास विभागाकडील दिनांक १६/१२/२००१ च्या अधिसुचनेन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची स्थापना झाली असून महानगरपालिकेचे क्षेत्र २६.३६ चौ.कि.मी. आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना ही शासन निर्णय टीपीएस-१२११/३३१/प्र.क्र. ४५/९९/नवि-१२ दि.३०/०३/२००१ व सम निर्णय दि.०८/०७/२००३ अन्वये मंजूर झाली असून ती अनुक्रमे दि.०१/०५/२००१ व दि. १४/०८/२००३ पासून अंमलात आलेली आहे.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा प्रारुप विकास आराखडा महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि.१२/१०/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला असून, त्यामध्ये मंजूर विकास योजनेमधील अंजुरफाटा ते (कल्याण नाका) ते फ्लोरा हॉटेल महानगरपालिका हद्दी पर्यंत दर्शविण्यात आलेले २४ मीटर व काही ठिकाणी ३० मीटर रुंदीचे रस्त्यांचे रुंदीकरण करुन ३६ मीटर प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. तद्नंतर उक्त अधिनियमाचे कलम २८(४) अन्वये सदर रुंदीकरणाचा प्रस्ताव कायम ठेवून सदर प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये दि. २६/०८/२०२५ रोजी शासनास मंजूरीस्तव सादर केली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखालील मेट्रो मार्ग-५ प्रकल्पाच्या कामांबाबत दि.२७/०६/२०२५ रोजी संपन्न आढावा बैठकीमध्ये भिवंडी शहराची सद्यस्थितीत वाहतुक व्यवस्था व

भविष्यात निर्माण होणा-या वाहतुक समस्यांचा विचार करता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने शहरात मेट्रो प्रकल्पाच्या अनुषंगाने विकास योजनेनुसार रस्ता रुंदीकरण व भूमी अधिग्रहण बाबत पुढाकार घेऊन कार्यवाही करणेबाबत प्राप्त निर्देशानूसार महानगरपालिकने भादवड, टेमघर मनपा हद्दीतील फ्लोरा हॉटेल ते स्व. राजीव गांधी चौक व कल्याण नाका ते अंजूर फाटा पर्यंत मुख्य रस्त्याचे प्रस्तावित मेट्रो प्रकल्प व प्रारुप विकास आराखडयानुसार सिमांकन करणेबाबत महानगरपालिकेतर्फे दि.०३/०७/२०२५ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी एकत्रिकृत विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र.११.२.२(१) मधील तरतुदीनुसार अंजूरफाटा ते स्व. राजीव गांधी चौक कल्याण नाका रस्तारुंदीकरणामध्ये बाधित होणारे मिळकतींना मोबदल्याच्या अनुषंगाने सुमारे ८१५ मालमत्ता धारकांना प्रथम नोटीस बजावण्यात आले असून, तद्नंतर विहित मुदतीत आवश्यक ते कागदपत्र सादर केलेले नसल्याने, महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६८ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) (अ) अन्वये बाधित होणा-या सर्व मिळकत धारकांना २४ तासांच्या आत अतिक्रमित व अनधिकृत मिळकती निर्मनुष्य करणे बाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. तदनंतर सदर ठिकाणी काही मिळकतधारकांनी स्वतः अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निष्काशित केली असून उर्वरित अतिक्रमित व अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेमार्फत निष्काशित करण्यात आलेली आहेत व त्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत सुमारे ४८८ मिळकत धारक/ भोगवटदार यांना पंचनामा देण्यात आलेला असून, उर्वरित मिळकतधारक यांना पंचनामा देण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर रस्तारुंदीकरणामध्ये एकुण २ मंदिर, १ मशीद व १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्धकृती पुतळा व माजी खासदार श्री. भाऊसाहेब धामणकर पूर्णाकृती पुतळा हे बाधित होत असून उक्त धार्मिक स्थळ व पुतळयांचे अनुषंगाने निष्कासनाची कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही. तसेच पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार मोबदला देण्याची तजवीज महानगरपालिकेमार्फत ठेवण्यात आली आहे.

भिवंडी शहरातील स्व. राजीव गाधी चौक ते फ्लोरा हॉटेल (टेमघर) मनपा हदी पर्यंत राज्य शासनामार्फत मेट्रो प्रकल्प-५ हे भूमिगत करण्यात आलेले असून स्व. राजीव गांधी चौक ते फ्लोरा हॉटेल (टेमघर) मनपा हद्दीपर्यंत प्रारुप विकास योजना मधील दर्शविण्यात आलेला ३६ मी. रुंद रस्त्याचे रुंदीकरणाचे काम आजमितीस हाती घेण्यात आलेले नाही.

***

RH-932-1A(A)-

७१

पु/४२२

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग लक्षवेधी सूचना क्रमांक १३९८

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्रीमती.देवयानी फरांदे, मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक शहरात सिंहस्थ कुंभमेळा पर्वणी होणार असणे, यासाठी विविध कामे नाशिक महानगरपालिकेकडून केली जात असणे, यात प्रामुख्याने सांडपाण्याची व्यवस्था पावसाळी गटार, पिण्याची पाईप लाईन व एम एन जी एल ची पाईपलाईन व सीसीटीव्हीच्या वायर भूमिगत करणे, यासारखी कामे करण्यात येणार असणे याबाबतचे अंदाजपत्रक तयार करताना मोठ्या प्रमाणावर त्रुटी असणे. पिण्याची पाईपलाईन टाकतांना नागरिक वापर करत असणाऱ्या जॉगिंग ट्रॅक व इतर नागरी सुविधा यांचे नुकसान होणे, हे नुकसान, तसेच रस्त्यावरून भूमिगत पाईपलाईन व भूमिगत सांडपाणी योजना टाकताना होणारे रस्त्याचे नुकसान, हे दुरुस्त करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद अंदाजपत्रकात न धरणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण होऊ शकणारा असंतोष, परिपूर्ण व पाईपलाईन टाकल्यामुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करून नव्याने अंदाजपत्रक तयार करण्याची असणारी आवश्यकता, रस्त्याच्या अंदाजपत्रक तयार करताना देखील योग्य प्रकारे अंदाजपत्रके तयार नकरता अपूर्ण अंदाजपत्रक तयार करणे, रस्त्याचे काम केल्यानंतर पाच वर्षात सदर रस्ता खोदायला लागणार नाही यासाठी आवश्यक तरतूद करण्याची असणारी आवश्यकता, रस्ता खोदायला लागल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित करण्याची असणारी आवश्यकता, आयुक्त तथा प्रशासक नाशिक महानगरपालिका यांचे या बाबीकडे होत असणारे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यामुळे लोकांमध्ये निर्माण होणारी असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

आगामी सिंहस्थ कुंभमेळा -२०२७ मध्ये येणा-या साधु-महंत व भाविक यांच्या सुविधेसाठी नाशिक महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्याअंतर्गत सांडपाण्याची व्यवस्था, पावसाळी गटार टाकणे, पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे, एम.एन.जी.एल.ची. लाईन टाकणे, सि.सि.टिव्ही च्या वायर भुमिगत करणे इ. कामांचा समावेश आहे.

एम.एन.जी.एल.गॅस लाईनचे काम करण्यापूर्वी सदर संस्थेमार्फत रस्ता दुरुस्ती साठी लागणारा खर्च वसुल करण्यात येतो. पावसाळी गटार टाकण्याचे काम करतांना देखील रस्ता दुरुस्तीचा समावेश करण्यात येतो. सी.सी.टिव्हीच्या ओ.एफ.सी.केबल टाकण्याच्या कामात देखील रस्ता सुस्थितीत करण्याची बाब करारात अंतर्भुत करण्यात येते. पाण्याची पाईप लाईन टाकणेच्या कामास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या नियमावलीनुसार रस्ता दुरुस्त करण्याच्या बाबींची तरतुद समाविष्ट करण्यात आली आहे. जॉगींग ट्रॅक सुस्थितीत करण्याच्या कामास महानगरपालिकेच्या महासभा ठराव क्र.६१४ दि.२८/११/२०२५ अन्वये तरतुद करण्यात आली आहे.



(5) HB-2194/1-2/810

सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत  करावयाच्या रस्ते, ओ.एफ.सी. केबल,पाण्याची पाईप लाईन इ. कामांना नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण  यांचेमार्फत प्रशासकीय मान्यता देण्यात येते. सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत करावयाच्या कामांमध्ये रस्त्यांच्या कामांचा देखील समावेश आहे. रस्त्याच्या कामांचे अंदाजपत्रक बनवितांना रस्त्यांची सद्यस्थिती , उपलब्ध जागा ,भुमिगत विविध सोयी-सुविधा इ.चा विचार करणेत आला आहे.

*************************************************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री.संजय उपाध्यय, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली

लक्षवेधी सूचना क्र.१६४९ पुढीलप्रमाणे आहे:-

"" २ ऑक्टोबरवसाहत किडवाईरोड शाळा बिल्डरने पुनर्वसन योजनेत घेतली परंतू बांधून दिलीच नाही.टॉवर बांधून विकून टाकले.रहिवाशांचे पुनर्वसन सन२०१५ला झाले.यावर शिक्षणसमितीत प्रचंड पडसाद उमटले. टॉवर विकण्यास N.O.C.कशी दिली गेली. या N.O.C.ला मनपा वॉर्ड अधिकारी यांनी आक्षेप का घेतला नाही. शिक्षण विभागातील अधिकारी यांनी आक्षेप न घेता जोपर्यंत शाळेचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत अशी N.O.C.देणे म्हणजे मोठा घोटाळा आहे.८ डिसेंबर२०१७ रोजी बिल्डरला टॉवर विकण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या एस.आर.ए. अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हा दाखल करावा. या N.O.C.ला आक्षेप न घेता संमती देणारे वॉर्ड अधिकारी एफ दक्षिण विभाग व अन्य दोन अधिकारी हे यात सहभागी दिसतात. २ ऑक्टोबर वसाहत किहवाई रोड शाळेत सन २००९ ला २५० विद्यार्थी होते ही शाळा हडप करण्यासाठी वनरूम किचनमध्ये ज्यात टॉयलेट-बाथरूम किचन सोडून फक्त १० फूट जागा बसण्यास होती तेथे ही शाळा तात्पुरती हलवली. शाळेची विद्यार्थी संख्या वनरूम किचन मध्ये हलवल्याने ६५ इतकी कमी झाली. हळू हळू पालकांनी मुलांना शाळेत टाकणे बंद केले.९ वर्गखोल्या थोडे मैदान ३७८६.५५ चौ.फूट जागा असलेली शाळा ४ वनरुम किचनमध्ये बसवल्याने शाळा बंद झाली. या बाबत अलिकडील काळात दि.१०/०८/२०२५ रोजी मनपा शिक्षण विभागाने २ पत्र बिल्डरला दिली आहेत परंतू २०१६ ते २०२५ पर्यंत शाळा मिळवण्यासाठी मनपा शिक्षण विभागाने कोणतीच गंभीर पावले उचलली नाहीत. या गंभीर घोटाळ्या प्रकरणाची चौकशी करत संबंधीतांवर तत्काळ पोलीसांत गुन्हा दाखल करून कठोरातील कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही..""

---

मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) महोदय यांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एफ/दक्षिण विभागातील सेकंड ऑक्टोबर वसाहत मनपा मराठी शाळा,बैठी इमारत या सन २०१४ मध्ये झोपडपट्टीचे पुनर्वसन प्रकल्प प्रकल्पांतर्गत निष्कसित करण्यात आले. झोपु प्रकल्पांतर्गत शिक्षण विभागासाठी एक स्वतंत्र इमारत बांधून देण्याबाबत विकासकाने मान्य केले होते. सदर बैठया इमारतीत भरत असलेल्या सेकंड ऑक्टोबर वसाहत मनपा मराठी शाळेचे वर्ग हे मे. ओमकार रियलटर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. विकासकामार्फत १०० मीटर अंतरावर असलेल्या मातोश्री या पुनर्वसित इमारतीत पहिल्या मजल्यावरील ०७ वर्गखोल्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित करण्यात आले . प्रत्यक्ष २५ विद्यार्थी शाळा पटावर होते. विकासकाकडून अद्याप शाळेकरिता स्वतंत्र इमारत बांधून देण्यात आलेली नाही.

सदरहू शाळेच्या कमी पटसंख्येअभावी भोईवाडा मनपा मराठी शाळेत विलीन करण्यात आली. शाळेकरिता देण्यात आलेल्या ०७ वर्गखोल्यांमधील ०३ वर्गखोल्यामध्ये शाळेचे साहित्य ठेवण्यात आले आहे. सदर सात वर्गखोल्यांचा देखभाल खर्च हा मातोश्री इमारतीच्या सोसायटीला विकासकामार्फत न मिळाल्याने सदर सोसायटीने शाळेच्या ०४ वर्गखोल्यांना टाळे लावल्याने दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी भोईवाडा पोलिस स्टेशन मध्ये पत्राव्दारे तक्रार देण्यात आलेली आहे.

शाळेच्या स्वतंत्र इमारत मिळण्याकरिता महानगरपालिका स्तरावरून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण यांच्यासोबत पाठपुरावा करून महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेकरिता १५७२.४१ चौरस मीटर एवढी जागा प्रस्तावित केली आहे.कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी विकास प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून मनपा शाळेकरिता स्वतंत्र इमारत बांधून पूर्ण होण्याकरिता दोन ते अडीच वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे

महानगरपालिका स्तरावर दि.०१ डिसेंबर २०२५ रोजी बैठक पार पडली सदरहू बैठकीत सेकंड ऑक्टोबर महानगरपालिका शाळेच्या विकासाकरीता मे ओमकार रियलटर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. या विकासकास बदलून aiperton developers या विकासकाची नियुक्ती करण्यात आली असून मातोश्री इमारतीतील ०४ वर्गखोल्यांचे थकीत देखभाल खर्चाचा भार alperton developers यांनी अदा केलेला आहे..

****

लक्षवेधी सूचना क्रमांक-६०४
पृ/४९७

महाराष्ट्र विधानसभा सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. किशोर जोरगेवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील अनेक महत्वाच्या विभागांमध्ये लेखा व वित्तीय कामकाजाशी संबंधित अनेक पदे दीर्घकाळापासून रिक्त असणे,सदर पदांवर भरती प्रक्रियेतील अटी व निकष बदलल्यामुळे वाणिज्य शाखा पदवीधरांवर झालेला अन्याय, यापूर्वी अशा पदांसाठी B.Com ही प्रमुख व मूलभूत पात्रता असून त्यात बदल करुन शासनाने "Any Degree" अशी अट टाकणे,तसेच काही ठिकाणी ३ ते ५ वर्षांचा अनुभव अनिवार्य करण्यात येणे, त्याचप्रमाणे काही खाजगी कोर्सेस अनिवार्य करण्यात येणे, या निर्णयामुळे वाणिज्य शाखा पदवीधर तरुणांमध्ये वाढता असंतोष, राज्यात सहकार विभागातील लेखापरीक्षक पदांची सुमारे ३२२ पदे रिक्त असणे, मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) लेखा व लेखापरीक्षण विभागातील अनेक पदे गेली दहा वर्षे भरण्यात आलेली नसणे, राज्यातील इतर विभागांमध्ये देखील लेखा व वित्तीय शाखेशी संबंधित मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून भरती स्थगित असणे, त्यामुळ वाणिज्य शाखा पदवीधर विद्यार्थ्यांकडून सहकार विभाग, BMC तसेच इतर विभागांतील लेखापरीक्षक व लेखा विभागातील सर्व रिक्त पदांची तातडीने भरती करण्याची आवश्यकता, लेखा व वित्तीय शाखेशी संबंधित सर्व पदांसाठी B.Com हीच अनिवार्य शैक्षणिक पात्रता ठेवण्याची तसेच ३ ते ५ वर्षांचा जाचक अनुभव व अनावश्यक खाजगी कोर्सेसची अट रद्द करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

श्री. अजित पवार, मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे निवेदन

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सेवाप्रवेश नियम दि.०१.०२.१९६५ नुसार संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक, लेखाधिकारी तसेच वर्ग-३ संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियुक्तीकरीता सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेशी संबंधित पदवी ही शैक्षणिक अर्हता निश्चित केली होती. तथापि, सदर सेवाप्रवेश नियम कालबाह्य झाल्याने सदर सेवाप्रवेश नियमामध्ये सन २०१२ मध्ये बदल केले असून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा (संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक आणि लेखाधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०१२ दि.१३.०९.२०१२ च्या अधिसूचनेनुसार सदर पदांवर नियुक्तीकरीता "वाणिज्य शाखेची स्नातक पदवी" ही शैक्षणिक अर्हता निश्चित केली आहे. त्यामुळे, २०१२ नंतर सदर पदांच्या भरतीमध्ये वाणिज्य पदवीधारकांनाच संधी मिळालेली आहे. तद्नंतर त्यात कोणताही बदल केलेला नाही.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये ३ ते ५ वर्षांचा अनुभव किंवा खाजगी कोर्सेस अनिवार्य करणेबाबतची अट समाविष्ठ नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०२.१२.२०२१ तसेच दि.०२.११.२०२२ च्या शासन निर्णयानुसार गट-क मधील लिपिकवर्गीय पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयानुसार, लेखा व कोषागारे संचालनालयातील "लेखा

HB/2174

लिपिक" आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयातील "लेखा परीक्षा लिपिक" ही गट-क संवर्गातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची व सदर पदांचे पदनाम बदलून "लिपिक टंकलेखक" असे सुधारित करण्याबाबत आणि सामान्य प्रशासन विभागामार्फत अधिसूचित करण्यात आलेले लिपिक-टंकलेखकांचे सेवाप्रवेश नियम लागू करण्याचा तसेच शैक्षणिक अर्हता "पदवी" करण्याचा वित्त विभागाच्या दि.१५.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

लिपिक-टंकलेखक या फिडर संवर्गाची शैक्षणिक अर्हता पदवी केल्याने कनिष्ठ लेखापाल संवर्गाची शैक्षणिक अर्हता सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने पदवी अशी करण्यात आली आहे. कनिष्ठ लेखापाल या संवर्गातील ४५६ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रीया राबविण्यात आली आहे. कनिष्ठ लेखापरीक्षक पदाकरीता वाणिज्यिक पदवी हीच अर्हता असून २२१ पदे रिक्त असून पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, सहायक संचालक संवर्गातील (वाणिज्य शैक्षणिक अर्हता) ७५ रिक्त पदांपैकी ४३ पदांची जाहिरात प्रसिद्ध होऊन नियुक्तीची कार्यवाही अंतीम टप्प्यात आहे. तर उर्वरीत ३२ पदांचे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. लेखा अधिकारी संवर्गातील (वाणिज्य शैक्षणिक अर्हता) ६० रिक्त पदांचे मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील लेखापरीक्षण विभागातील सरळसेवेच्या कोट्यात ६६० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १६८ पदे भरलेली असून ४९२ पदे रिक्त आहेत. ९७ व्या घटनादुरुस्तीमुळे गट "अ" व "ब" ची पदे भरण्यात आलेली नाहीत. आकृतीबंध अंतिम झालेला नसल्याने गट "क" ची पदे भरलेली नाहीत. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे दि.२३.०१.२०२५ रोजीचे अधिसूचनेन्वये गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम प्रसिद्ध करण्यात आले आहे. सहकार विभागातील लेखापरीक्षणांतर्गत येणाऱ्या गट-अ ते गट-क मधील पदांसाठीची शैक्षणिक अर्हता ही वाणिज्य शाखेतील पदवीधर अशीच असून सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण किंवा सहकार व्यवस्थापनाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव ही अट केवळ गट-अ संवर्गातील पदांसाठी असून गट-ब व गट-क संवर्गातील पदांसाठी अनुभवाची अट नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक या पदाकरीता वाणिज्य शाखेची पदवी ही अर्हता असून महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक खात्याच्या आस्थापना अनुसूचीवर कनिष्ठ लेखापरीक्षा सहाय्यक संवर्गाची ३६९ पदे मंजूर असून १८१ पदे कार्यरत आहेत व १८८ पदे रिक्त आहेत. प्रमुख लेखापाल (वित्त) व प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) खात्यातील कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक संवर्गातील २१२ रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही आकृतीबंध अंतीम होण्याच्या अधिनस्त सुरु आहे. या पदासाठी देखील वाणिज्य शाखेचा पदवीधर हीच शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

त्यामुळे, वाणिज्य शाखा पदवीधरांवर अन्याय होत आहे असे म्हणता येणार नाही.

**********

लक्षवेधी सूचना क्र.९१७

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे हिवाळी अधिवेशन

मा. श्री. सुनिल प्रभू, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९१७ पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई उपनगर जिल्हा कुर्ला गाव तुंगवा येथील सर मोहम्मद युसूफ ट्रस्टच्या नावे असलेली मिळकतीचा सीएस क्र. १०६ (पैकी) १०७-अ,क, ड मधील ६१५०.३० चौ.मी. तसेच याच गावातील इशा असोसिएट्स च्या मिळकतीचा सीएस क्र, १०५, १०९, ११०, ११५ मधील २००००.१०० चौ.मी. क्षेत्राचा मिळून बाजारभावानुसार १७० कोटी रुपये किमतीचा टीडीआर अवघ्या १६ लाख, २२ हजार रुपयाचे दस्ताद्वारे हस्तांतरित करुन यामध्ये शासनाची व महापालिकेची फसवणूक करून कोट्यावधी रुपयाचा अर्थिक घोटाळा झाल्याचा धक्कादायक प्रकार दि.१.१२.२०२५ रोजी निदर्शनास येणे, उक्त मिळकतीचे १९५६ भूसंपादन केल्यानंतर १९८६ साली अवार्ड जाहीर करुन सर मोहम्मद युसूफ ट्रस्टच्या खात्यावर ७५ हजार ९१७ इतकी नुकसान भरपाईची रक्कम शासनाने भरण्यात येऊनही सदरहू मिळकतीच्या ट्रस्टीनी शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन अधिग्रहित जमीनीची नुकसान भरपाईची रक्कम अदा केली असतांनाही ट्रस्टींनी मा. न्यायालयात याचिका दाखल करून व मा. न्यायालयाच्या निकालाच्या आधारे टीडीआर मंजूर करुन कोट्यावधी रुपयाचा अर्थिक घोटाळा करण्यात येणे, या संदर्भात फारुक ए आर युसूफ यांनी दि.०३.०१.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, सदरहू प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी विरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

### श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नविन क्लोरिनेशन हाऊसच्या पोच रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे तुंगवा, ता. कुर्ला येथील जुने सर्व्हे क्र. ८८ पै, ७८ पै, ७९पै, ९० पै, ३०पै व पासपोली ता. कुर्ला येथील जुना सर्व्हे क्र. ४६ पै, नविन सर्व्हे क्र. ८पै मधील एकुण ५ एकर २४ गुंठे ४ आणे या क्षेत्रासाठी अतिरिक्त विशेष भूसंपादन अधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून भूसंपादनाची कार्यवाही करताना विहित कार्यपध्दतीनुसार दि.२५/०६/१९८६ रोजी निवाडा पारित करण्यात येऊन सदर जमिनीचा आगाऊ ताबा दि.२६/१०/१९५७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आला आहे.

तसेच सदर निवाड्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संपादनापोटी प्राप्त

रक्कमेपैकी मौजे तुंगवा, ता. कुर्ला येथील स.नं.४१ पै बाबतची मोबदला रक्कम रू ३९०८७/- संबंधित भूधारकास अदा करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम रु.७५,९१७/- बाबत नुकसान भरपाईच्या अनुषंगाने सर मोहम्मद युसुफ ट्रस्ट व इतर यांनी दाखल केलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात जमा करण्यात आली.

सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने भूसंदर्भ क्र.०२/१९८७ वर निर्णय देताना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रतिवादी नसल्याने, प्रतिवादी सर मोहम्मद युसुफ ट्रस्ट व इतर यांनी नुकसान भरपाईच्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र /एफ.एस.आय. मिळण्यासाठी अर्ज केल्यास व महानगरपालिकेने सदर विनंती मान्य केल्यास महानगरपालिकेला न्यायालयाच्या संदर्भखात्यास जमा असलेली रक्कम काढता येईल. तसेच प्रतिवादींची याबाबतची विनंती अमान्य केल्यास प्रतिवादींना मा. न्यायालयामध्ये जमा असलेली नुकसान भरपाईची रक्कम काढण्याची मुभा असेल असे नमूद करून सदर भूसंदर्भ निकाली काढण्यात आला.

यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार, वास्तुविशारद, सर मोहम्मद युसुफ ट्रस्ट यांनी दि.२०.०९.२००४ रोजी ताबा घेण्यात आलेल्या जमिनीच्या बदल्यात विकास हक्क प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात केलेली विनंती बृहन्मुंबई महानगरपालिकेने नगर विकास विभागाचे दि.०८.०३.१९९५ रोजी विकास नियंत्रण नियमावली मधील नियम ६२(३) बाबत दिलेले स्पष्टीकरण विचारात घेऊन, विचाराधीन जागेचा सन १९५७ मध्ये ताबा घेण्यात आला असल्याने, विनंती नाकारली आहे.

तद्नंतर दि.१२.१०.२००० रोजी ट्रस्टच्या वतीने विकास हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत पुन्हा केलेली विनंती विचारात घेऊन त्यासंदर्भातील याचिका क्र.१६७१/२०१५ मागे घेण्यात आल्यानंतर नगर विकास विभागाच्या दि.१५.०३.२०२४ चे स्पष्टीकरण विचारात घेऊन महानगरपालिकेने स्थानिक वृत्तपत्रात सार्वजनिक जाहिरातीद्वारे दावे, हक्क व हरकती मागून मालमत्ता शिर्षक जारी केले. तद्नंतर मौजे तुंगवा व पासपोली गावामधील अनुक्रमे २०,१०० चौ.मी. आणि ६१५०.३० चौ.मी. बाबतचे विकास हक्क प्रमाणपत्र एसा असोसियट्स व सर मोहम्मद युसुफ ट्रस्ट यांना अदा करण्यात आले आहे.

श्री. फारुख ए. आर. युसुफ यांनी दि.०३.०१.२०२५ रोजी शासनास लिहिलेल्या पत्रान्वये विकास हक्क प्रमाणपत्रासाठी सभासदांची अंतर्गत मान्यता व प्रक्रिया पालन न करणे याबाबत आक्षेप घेऊन असे विकास हक्क प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने एसा असोसियट्स व सर मोहम्मद युसुफ ट्रस्ट यांच्याकडून अभिप्राय मागविण्यात आली असून, अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नियोजित आहे.

-----------------------------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृत्तीय (हिवाळी) अधिवेशन

मा. श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ११७१ पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजे याकतपूर ता. औसा जि. लातूर येथील जिल्हाधिकारी लातूर यांनी वन विभागास हस्तांतरित केलेले सर्वे न. २३३ क्षेत्र १०.३६ हे. आर हे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ नुसार प्राथमिक राखीव वन म्हणून घोषित करण्यात आलेले असणे, सदरील प्राथमिक राखीव वनातील डोंगर माथ्यावर याकतपूरसह परिसरातील गावांचे श्रध्दास्थान असलेले पुरातन देवी मंदिर असून या ठिकाणी दररोज या भागातील नागरिक दर्शनासाठी या ठिकाणी येत असणे, या देवी मंदिराचा उल्लेख/नोंद जमीन हस्तांतरण कार्यवाहीत सदरील घोषित प्राथमिक राखीव वन च्या नोंदीमध्ये करण्याची आवश्यकता असतानाही त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, सदरील मंदिरासाठी जाणे येणे साठी वन विभागाने स्वतंत्र रस्ता सोडलेला असणे, मंदिराचा विकास करणे आणि भक्तांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असल्याने ग्रामपंचायत्त याकतपूर यांनी सदरील देवी मंदिर व समोरील जमीन वन विभागाच्या मालकीतून वगळण्याबाबत ठरावाव्दारे २०२३ मध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी लातूर यांच्याकडे मागणी केली असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी लातूर यांनीही सदरील प्रकरणी उचित कार्यवाही करण्याबाबत निवेदन दिले असणे, परंतु विभागीय वन अधिकारी धाराशिव यांनी केंद्र शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता असल्याचे कळविले असणे, सदरील देवी मंदिर व त्यासमोरील जमीन वन विभागाच्या मालकीतून वगळण्याबाबत व ग्रामपंचायतीस वळती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री (वने) | निवेदन | श्री. गणेश नाईक

मौजे याकतपूर, ता. औसा जि. लातूर येथील सर्वे / गट क्र. २३३ चे १०.३६ हे. आर क्षेत्र जिल्हाधिकारी यांच्या ताब्यातील शासकीय क्षेत्र होते. मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्रमांक २०२/१९९५ व १७१/१९९६ मध्ये दिनांक १२.१२.१९९६ रोजी पारित आदेशास अनुलक्षून सदर क्षेत्राचा समावेश वनसदृश्य क्षेत्राच्या यादीत करण्यात आला आहे.

तद्नंतर "वन" या संज्ञेत येणारे क्षेत्र राखीव वनक्षेत्र म्हणून अधिसुचित करण्यासाठी सदर क्षेत्राचा ताबा जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक ३.०१.२०१५ रोजी वन विभागास दिला आहे. सदरील क्षेत्र शासन राजपत्र क्र. एफएलडी-२८ (आ)/२०१९/प्र.क्र.३९३/फ-३, दिनांक-१७.०५.२०१९ अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अंतर्गत राखीव वन म्हणून अधिसुचित करण्याबाबत प्रस्तावित असल्याचे घोषीत करुन सदर क्षेत्रावरील कोणत्याही

UB/2150 — 710 प्रति

व्यक्तीच्या कथित अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्यासाठी वनजमाबंदी अधिकारी, औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर वनजमांबदी चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

मौजे याकतपूर येथील डोंगरावर देवीचे पुरातन मंदिर असुन मंदिर परिसराचा जीर्णोध्दार करण्याकरिता मंदिर व समोरील सर्व भाग हा वन विभागाच्या मालकी हक्कातून वगळून ग्रामपंचायतीस देण्याची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच ग्रामपंचायत, याकतपूर (बरोडा) यांनी केली होती. त्यास अनुलक्षून विभागीय वन अधिकारी, धाराशिव यांनी दिनांक १७.११.२०२५ च्या पत्रान्वये मा. स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी व ग्रामपंचायत यांना क्षेत्राबाबतचा सद्यस्थितीदर्शक अहवाल सादर करुन प्रकरणी केंद्र शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

प्रस्तुत क्षेत्र वनसदृश्य क्षेत्राच्या यादीत असल्यामुळे तसेच प्रस्तावित राखीव वन म्हणून अधिसूचित असल्यामुळे भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ५ च्या तरतूदी लागू होतात. हे पहाता सदर क्षेत्रावरील वनेत्तर कामास वन (संवर्धन तथा संरक्षण) अधिनियम, १९८० च्या तरतूदीनुसार केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

********************

पृ/४२३

१२६.

लक्षवेधी सूचना क्र. ३४५

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना**

श्री. तुकाराम काते, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३४५ पुढीलप्रमाणे आहे :-

"संपूर्ण महाराष्ट्र राज्यांमध्ये प्रथम मान्यता हीच कायमस्वरूपाची मान्यता ग्राह्य धरली जात असताना मुंबई महापालिका क्षेत्रातील खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांना प्रत्येक पाच वर्षानंतर मुदतवाढ घेणे बंधनकारक असणे, मुंबईतील फक्त इयत्ता पहिली ते इयत्ता चौथीच्या प्राथमिक शाळा मुदतवाढ लादली जाऊन मान्यता घेताना शाळा व्यवस्थापन यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असणे, मुंबई महापालिका शिक्षण विभागाकडून क्लार्क पासून ते माननीय आयुक्तांपर्यंत मान्यता फाईल मंजूर घेण्यास प्रचंड कालावधी लागत असणे, मागील १५ वर्षापासून अनुदान पासून वंचित असलेल्या मुंबईतील ९२ शाळांना आपल्या सरकारने अनुदान देण्याचा निर्णय घेतला व त्या प्रस्तावाला माननीय आयुक्त मुंबई महापालिका यांनी दिनांक ८ नोव्हेंबर २०२३ रोजी मंजुरी देऊनही ४९० स्क्वेअर फुटाच्या वर्ग खोल्या असणे बंधनकारक असल्याची जाचक अट टाकल्याने व मान्यता मुदतवाढ न दिले असल्याने मराठी माध्यमाच्या शाळांना अनुदान प्रस्ताव मंजूर होत नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मध्यांन भोजन या सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

*******************************************************************************************

## मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

"बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी संस्थांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक (इ.१ ली ते इ.४ थी) शाळांना अनुदान सहाय्य संहिता, १९६८ अन्वये प्रथम मान्यता, मान्यता मुदतवाढ आणि अनुदान सहाय्य मंजूर करण्यात येते. सदर प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता, मान्यता मुदतवाढ व अनुदान नोंदणीचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करताना महानगरपालिका निकष / नियम तसेच आर.टी.ई. कायद्यानुसार भौतिक सुविधाबाबतचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर खाजगी प्राथमिक शाळांना प्रथम मान्यता आणि मान्यता मुदतवाढ देण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीला आहेत. सद्यस्थितीत, शाळांना मान्यता मुदतवाढ दर पाच वर्षासाठी शिक्षण समितीच्या मंजुरीने देण्यात येते.

२. राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अनुदानाच्या धोरणानुसार ज्या शाळांना राज्य शासनाने मान्यता प्रदान केली आहे, त्या शाळांना शासन निर्णय, दि.१५.११.२०११ व शासन निर्णय, दि.१३.०७.२०१३ च्या निकषांच्या अधिनतेने अनुदान अनुज्ञेय आहे. राज्य शासनाची मान्यता नसताना, बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणतेही अधिकार नसताना, त्यांचे स्तरावरुन परस्पर मान्यता प्रदान केलेल्या शाळांना राज्य शासनाच्या अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नाही, असे

शासनाने दि.१३.०१.२००४, दि.२२.०३.२०१७ व दि.२०.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये वेळोवेळी कळविले आहे. तसेच, शासन पत्र, दि.१५.०९.२०२३ अन्वये देखील पुन्हा कळविण्यात आली आहे.

३. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार शाळांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय दि.२९.०६.२०१३ अन्वये राज्यातील शाळांकरीता वर्गखोली, मुलां-मुलींकरीता स्वतंत्र स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, संरक्षण भिंत, खेळाचे मैदान, उताराचा रस्ता (रॅम्प), स्वयंपाकगृह इत्यादी मुलभूत सुविधांबाबतचे निकष निश्चित करण्यात आले आहेत.

४. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अन्वये वय वर्षे ६ ते १४ वयोगटातील मुलांना दर्जेदार व गुणवत्तापूर्व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. शाळांमध्ये मुलांच्या शिक्षणासाठी पोषक वातावरण राहण्यासाठी पुरेशी मोकळी जागा असणे आवश्यक आहे. तसेच, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार प्रत्येक शिक्षकासाठी एक वर्ग, ऑफिस, स्टोर्स रुम व मुख्याध्यापक यांचेसाठी संयुक्त वर्ग, विद्यार्थ्यांना अडथळा मुक्त प्रवेश, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, सर्व विद्यार्थ्यांसाठी पुरेसे व शुध्द पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, मध्यान्ह भोजनासाठी किचन शेड, क्रीडांगण व शाळेसाठी कंपाऊड असणे आवश्यक आहे. तसेच, आगी सारख्या आपत्कालीन घटना घडल्यास बचाव कार्य करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध असणे देखील आवश्यक आहे."

*****

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

लक्षवेधी सूचना क्र.४९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र.४९ पुढीलप्रमाणे आहे:-

"छत्तीसगडमधून नाकारण्यात आलेल्या कोळशाची माफियांकडून यवतमाळ व चंद्रपूर येथिल कोळसा डेपोतून खुलेआम विक्री होत असणे, हा कोळसा मंत्रालयाने प्रदूषणकारक असल्याने नाकारलेला असून कोळशाची विक्री मर्यादित करणे, वणी-चंद्रपूर परिसरातील काही कोळसा व्यापारी नियमांची पायमल्ली करीत हा कोळसा उत्कृष्टमध्ये मिसळून विकत असल्याचे निदर्शनास येणे, या कोळस्याची मोठया प्रमाणात अवैधरित्या वाहतूक आणि विक्री करण्यात असून शासनाची करोडो रुपयांची फसवणूक करीत असणे, याकडे प्रदूषण विभागाचे दुर्लक्ष होत असणे, या गंभीर प्रकरणाची प्रदूषण विभाग व पोलीस विभाग यवतमाळ, चंद्रपूर येथे तक्रार होऊन सुद्धा सखोल चौकशी करण्यात येत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष त्यामुळे या प्रकरणाची सखोल चोकशी करून संबधितावर कार्यवाही होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

---

मा. मंत्री (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांचे निवेदन

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर व पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या दि.०९/१२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार चंद्रपूर जिल्हा पोलीस घटकामध्ये छत्तीसगड मधून नाकारण्यात आलेल्या कोळशाची माफियांकडून चंद्रपूर परिसरातील कोळसा डेपोतून विक्री होत असल्याबाबत तसेच कोळसा व्यापारी नियमांची पायमल्ली करुन सदरचा कोळसा उत्कृष्ट दर्जाच्या कोळशामध्ये मिसळवून त्याची अवैधरित्या वाहतूक अथवा विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. सदरच्या अनुषंगाने तक्रार प्राप्त झाल्यास पोलीस अधीक्षक, चंद्रपूर व यवतमाळ यांचेकडून कार्यवाही करण्यात येते.

चंद्रपूर व यवतमाळ जिल्हा खनिज संपत्तीने विपुल असून या मध्ये प्रामुख्याने लाईम स्टोन, कोळसा व डोलोमाईट खनिजांचे समावेश आहे. या जिल्ह्यात खनिजे विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्यावर आधारित औद्योगिकीकरणास चालना मिळाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मुख्यत्वे पडोली ते घुग्घूस रोडवर अस्तित्वात असलेल्या कोळसा डेपोच्या हवा प्रदूषणाबाबतच्या बऱ्याच तक्रारी स्थानिक नागरीकांकडून तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडून मंडळास वेळोवेळी प्राप्त होतात. सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१९ मध्ये सदर रस्त्यालगत असलेल्या सर्व २३ कोळसा डेपो हे हवा प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या सयंत्रणा नसल्याचे आढळून आल्यामुळे बंद करण्यात आले होते. तद्नंतर माहे जुलै-२०२४ ते सप्टेंबर-२०२४ दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणादरम्यान सदर कोळसा डेपो बंद असल्याचे आढळून आले आहे.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये मुख्यत्वे वणी शहरालगत कोळसा डेपो कार्यरत आहेत. या कोळसा डेपोच्या हवा प्रदूषणाबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वणी परिसरातील एकूण ३९ कोळसा डेपोंचे दि. २६ ते २९ नोव्हेंबर-२०२५ दरम्यान सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणादरम्यान आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सर्व ३९ कोळसा डेपोनां दि.२६, २७, २८ व २९ नोव्हेंबर, २०२५ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर व जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांच्या दि.०९/१०/२०२५ रोजीच्या अहवालानुसार राज्यातील कोळसा डेपोंना व्यापारी कारणाकरिता कोळसा विक्री करण्यासाठी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून कोळश्याच्या साठ्याची निश्चीती करुन अधिकृतरित्या नियुक्त कोळसा डेपोधारकांना नोडल एजन्सी म्हणून कोळसा वाटप केला जातो. या निश्चीत करण्यात आलेल्या साठ्याच्या व्यतिरिक्त जास्तीचा कोळसा डेपोधारकांना विक्री करता येत नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर कार्यालयामार्फत मोटार वाहन कायदा, १९८८ मधील तरतुदींनुसार रस्ता सुरक्षा विषयक बाबींची अंमलबजावणी करण्यात येते. प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर यांच्या दि.०९/१२/२०२५ रोजीच्या अहवालानुसार वाहन तपासणी दरम्यान निकृष्ठ कोळश्याची अवैध वाहतूकीचा प्रकार होत असल्याबाबत त्यांचे कार्यालयाकडे कोणतेही पुर्वसूचना प्राप्त झालेली नाही. प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर कार्यालयामार्फत वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते. कोळश्याची तसेच अन्य प्रकारच्या मालाची ओव्हरलोड वाहतूक तसेच विना ताडपत्री वाहतूक करीत असल्याचे निर्दशनास आल्यास सदर वाहनांना मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

********************************

प्र/४२७
२०४

लक्षवेधी सूचना क्र. १४०७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे हिवाळी (तृतीय) अधिवेशन

श्री. सत्यजित देशमुख, विधानसभा सदस्य यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"शिराळा व वाळवा तालुक्यात माहे मे ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांना खरीप व रब्बी पिकांची पेरणी करता न आल्याने हजारो शेतकरी दुहेरी संकटात सापडलेले असणे, हजारो एकर जमीन पेरणीविना पडून असणे, सदर ठिकाणी अतोनात शेतीपिकांचे तसेच शेतीचे नुकसान होवूनही शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत न झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले असणे, तदनुषंगाने अनेक शेतकऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांच्याकडे त्वरीत नुकसान भरपाई मिळणेबाबतची मागणी केलेली असणे, नापेर व अतिवृष्टीने शेती पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत आर्थिक मदत मिळणेकामी मा. मुख्यमंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवदेनाद्वारे मागणी केलेली असणे, त्यानुषंगाने उक्त गंभीर प्रकरणी चौकशी करुन आपत्कालीन उपाययोजना, बाधित, नापेर क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन त्यांना त्वरीत आर्थिक मदत मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

---

मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन

माहे मे २०२५ मध्ये सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात व वाळवा तालुक्यात पाऊसास सुरुवात झाल्याने १२ दिवस पर्जन्यवृष्टी झाली त्यामुळे पूर्व मशागतीची कामे सुरू झाली नाहीत.

सततचा पाऊस राहिल्यामुळे शेत जमीन वाफसा न आल्यामुळे सरी मोडणे / पेरणी कामे झाली नाहीत तसेच तालुक्यातील इस्लामपूर-सांगली, वाळवा कासेगाव, पुणे-बेंगलोर हायवे रस्त्याची उंची वाढल्यामुळे रस्त्याकडील जमिनीतील पाण्याचा निचरा झाला नसल्यामुळे पाणी साठून राहिल्यामुळे त्या भागात सुद्धा पेरणी होऊ शकली नाही. पर्जन्यमानामध्ये खंड नसल्यामुळे सोयाबीन, भुईमुग व मका इ. पिकाची पेरणीकमी प्रमाणात झाली सतत च्या पावसामुळे जमिनीत ओल कायम राहिल्याने (वाफसा न आल्याने) शेतका-यांना पूर्व मशागत करता आली नाही.

शिराळा व वाळवा तालुक्यांमध्ये माहे मे २०२५ ते माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या ज्या भागात पुर आला व अतिवृष्टी झाली त्यामुळे झालेल्या शेतीपिक व फळपीके, शेतजमीनीचे नुकसान शासनाच्या प्रचलित नियमानुसार डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वितरीत करण्यात आले आहे.

**********

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तृतीय ( हिवाळी) अधिवेशन

श्री.सुनिल प्रभु, श्री. अमोल खताळ,विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २२३ पुढीलप्रमाणे आहे -

"मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील गुलमोहर रोड जेव्हीपीडी सीएस क्र.१२७ मधील स्टर्लिंग को. ऑप. सोसायटी संबधी प्रकरणात सोसायटी कार्यकारिणी समिती अस्तित्वात नसतांना व गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नियुक्त असतांना तत्कालिन उपनिबंधक, सहकार संस्था विभाग, म्हाडा यांनी परस्पर पदाचा दुरुपयोग करुन हिरेन्द्र गांधी या त्रयस्थ व्यक्तीला उपरोक्त गृहनिर्माण संस्थेचे सदस्यपद बेकायदेशीर रित्या दिल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू गृहनिर्माण संस्थेवर २०२३ या कालावधीत शासनातर्फे प्रशासक नियुक्त करण्यात येणे, हिरेन्द्र गांधी यांनी संस्थेचे सदस्यत्व मिळण्यासाठी प्रशासक यांना दि. १७.०७.२०२३ रोजी दिलेला अर्ज फेटाळण्यात आलेला असतानांही, तत्कालिन उपनिबंधकांनी हिरेन्द्र गांधी यांना संस्थेचे सदस्यत्व देण्यात येऊन यामध्ये लाखो रुपयाचा केलेला भ्रष्ट्रचार या संदर्भात अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, मुंबई यांनी दि.०३.०६.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सहकार आयुक्त यांना लेखी निवेदन देऊनही यावर अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू प्रकरणी शासनाने हिरेन्द्र गांधी यांना संस्थेचे सदस्य पद तत्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

## मा.मंत्री (सहकार) यांचे निवेदन

जे. व्ही. पी. डी. स्टर्लिंग को. ऑप. हाउसिंग सोसायटी लि., जेव्हीपीडी स्किम,विले पार्ले (पश्चिम), मुंबई या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्री. हिरेन गांधी यांनी प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे संस्थे मधील सद्निका क्र. ४०१ हस्तांतरित करणेबाबत दि. ०९.०२.२०२३ रोजी सभासदत्व अर्ज दाखल केला होता. प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नसल्यामुळे दिनांक १७.०७.२०२३ रोजी सदर सभासदत्व अर्ज नामंजूर केला होता.

त्यावर श्री. हिरेन गांधी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २३ (२) अन्वये उपनिबंधक, मुंबई पश्चिम उपनगरे, मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई यांच्याकडे अपील दाखल केलेले होते. सदर अपिलामध्ये संबंधितांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आलेली होती. श्री. हिरेन गांधी यांनी संस्थेतील सदनिका क्रमांक ४०१, मे. कमला लँडमार्क बिल्डर्स यांचेकडून दि.१०.०३.२००८ रोजीचे नोंदणीकृत खरेदी कराराद्वारे खरेदी केलेली असून त्यावर मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा केलेला आहे. सदर खरेदी कराराच्या आधारे उपनिबंधक, मुंबई पश्चिम उपनगरे, मुंबई,गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा, मुंबई यांनी दिनांक ०४.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. हिरेन गांधी यांचे अपील मंजूर करुन त्यांना सभासदत्व देणेबाबत संस्थेस आदेश दिलेले आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी होउन संस्थेने श्री. गांधी यांना सभासदत्व दिलेले आहे.

श्री. गांधी यांचे सभासदत्व रद्द करण्याठी संस्थेचे सभासद श्री. योगेश शेट्टी व इतर ५ यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४-ब ९ अन्वये उपनिबंधक, म्हाडा यांच्याकडे दिनांक २७.०९.२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला होता तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये संस्थेचे सभासद श्री. पर्वत शेट्टी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, येथे रिट पिटीशन क्र. ६२४४/२०२४ दाखल केले होते. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०६.०५.२०२४ रोजीच्या आदेशानुसार आठ आठवड्यामध्ये निर्णय घेण्यासाठी उपनिबंधक, म्हाडा यांना आदेशीत केले होते. या आदेशानुसार सदर अर्जावर सर्व संबंधितांना म्हणणे मांडण्यासाठी वाजवी संधी देण्यात आल्यानंतर उपनिबंधक, म्हाडा यांनी दि.२५.०९.२०२५ रोजी आदेश पारित करुन श्री. पर्वत शेट्टी यांचा अर्ज नामंजूर केलेला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४-ब ९ नुसार संस्थेने एखाद्या व्यक्तीस सभासदत्व दिले असेल तर सदरचे दिलेले सभासदत्व हे सहकार कायदा, नियम व उपविधीमधील तरतुदीनुसार दिले आहे किंवा कसे याबाबत निर्णय करण्याचा अधिकार निबंधकास आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी उपनिबंधक, म्हाडा यांनी त्यांच्या दिनांक ०४.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री. हिरेन गांधी यांना सभासदत्व मंजूर केले आहे.

या प्रकरणी श्री. सुहास राणे, संभाजी ब्रिग्रेड, मुंबई यांनी मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री व सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांना दि.०३.०६.२०२५ रोजी निवेदन दिले असून कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश गृह निर्माण विभागाने उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना दिले आहेत. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**************

लक्षवेधी सूचना क्र. ५३९

पु/ ४३१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

श्री. राजेश वानखडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५३९ पुढीलप्रमाणे आहे.

“"अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील तिवसा तालुक्यातील नवीन चार आरोग्य उपकेंद्रांच्या इमारती अनुक्रमे बोर्डा, वाठोडा, ममदापूर व भिवापूर शासनाद्वारे उभारण्यात येणे. या उपकेंद्रांमध्ये कर्मचायांची पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध न होणे, त्याचप्रमाणे तिवसा तालुक्यातील तीन आरोग्य केंद्रांसह उपकेंद्रांमध्ये वैद्यकीय अधीक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक पुरुष, परिचय, सफाई कर्मचारी अशी विविध संवर्गातील एकूण ३१ पदे रिक्त असणे, यात कुऱ्हा, मार्डी, तळेगाव ठाकूर ही आरोग्य केंद्रे तळेगाव ठाकूर विभागातील आठ उपकेंद्रे कुऱ्हा विभागातील सात व मार्डी विभागातील पाच अशी एकूण वीस केंद्रांवर कर्मचाऱ्यांची कमतरता निर्माण होणे, त्यामुळे नागरिकांना आरोग्य सेवेकरीता तालुकास्तरावर उपचाराकरिता जाणे क्रमप्राप्त होणे, आरोग्य सेवेतील पदे रिक्त असल्याबाबत सातत्याने वृत्तपत्रांमध्ये वृत्त प्रकाशित होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती रोष निर्माण होणे, परिणामी आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता तीवसा मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यातील आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

**मा. श्री. प्रकाश अबिटकर, मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदनः-**

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे आदेश क्र. जिपा/आवि/आस्था-२/३२४२/२०२५ दि. २९.०५.२०२५ अन्वये तिवसा तालुक्यातील नविन चार आरोग्य उपकेंद्रामध्ये अनुक्रमे बोर्डी, वाठोडा, ममदापूर व भिवापूर अशा चारही उपकेंद्रांमध्ये आरोग्य सेवक महिला, आरोग्य सेवक पुरूष व समुदाय आरोग्य अधिकारी यांची नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील उसनवारी तत्वावर मनुषबळ सेवा अधिग्रहीत करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच तिवसा तालुक्यातील ममदापूर व भिवापूर या ठिकाणी पदनिर्मीती करण्यात आलेली आहे. बोर्डा व वाठोरा येथील उपकेंद्रामध्ये पद निर्मीतीची कार्यवाही चालु आहे. तिवसा तालुक्यातील कुऱ्हा, मार्डी, तळेगाव ठाकूर या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील मंजूर, भरलेली, रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

पंचायत समिती तिवसा

| अ.क्र. | पचांयत समिती | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | पं. स. तिवसा | आरोग्य पर्यवेक्षक | ३ | ३ | ० |
| २ | | आरोग्य सेवक (पु) | १ | ० | १ |
| | | एकूण | ४ | ३ | १ |

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय तिवसा

| अ.क्र. | पचांयत समिती | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय तिवसा | ता. आ. अधिकारी | १ | १ | ० |
| २ | | आरोग्य सहायक (पु) | १ | ० | १ |
| ३ | | कनिष्ठ सहायक | १ | १ | ० |
| ४ | | परिचर | १ | ० | १ |
| | | एकुण | ४ | २ | २ |

| अ.क्र. | संस्थेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक आरोग्य केंद्र कुऱ्हा (उपकेंद्रासह) | ३० | १८ | १२ |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र मार्डी (उपकेंद्रासह) | २६ | २५ | १ |
| ३ | प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगाव ठाकूर(उपकेंद्रासह) | ३४ | २१ | १३ |
| ४ | एकूण | ९८ | ६९ | २९ |

तिवसा तालुक्यात एकूण ९८ पदे मंजूर असून ६९ पदे भरलेली आहेत व २९ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण २ पदे ही भरण्यात आली आहेत, तसेच ज्या ठिकाणी पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी उसनवारी तत्वावर सेवा अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा सुरळीत पुरविण्यात येत आहेत.

*************